“मराठवाड्यातील ग्रामीण कथात्मक वाङ्मयाचा चिकित्सक अभ्यास (विशेष संदर्भ इ. स. २००५ ते २०१५)”

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या भाषा आणि साहित्य संकूलातर्गत मराठी या विषयातील पीएच.डी. पदवीसाठी सादर करावयाचा पीएच.डी. पूर्व संशोधनाचा आराखडा.

संशोधक

पूजा संजय मोरे

मार्गदर्शक

प्रा. डॉ. पृथ्वीराज तौर

मराठी विभाग

भाषा आणि साहित्य संकूल

स्वा. रा. ती. म. विद्यापीठ, नांदेड

मार्च : २०२२

प्रस्तावना

ग्रामीण साहित्याची निर्मिती मराठीमध्ये मोठ्या प्रमाणात होत आहे. त्यातल्या त्यात कथा अधिक प्रमाणात लिहिल्या जात आहेत. साहित्य निर्मितीच्या एकूणच क्षेत्रात आज मोठ्या प्रमाणात बदल झाला आहे. साहित्य निर्मितीचे केंद्र आज शहराकडून खेड्यापाड्यात पोहोचले. जागतिकीकरण आणि माहिती तंत्रज्ञान इत्यादी कारणांनी ग्रामीण जीवनात प्रचंड बदल झाला. याचा परिणाम साहित्यावर होणे अपरिहार्य आहे. ग्रामीण माणूस आता जागृत झाला आहे. तो शोषण व्यवस्थेवर प्रहार करतो. अनेक प्रतिभावंत ग्रामीण तरूण लिहू लागल्याने आपल्या परिसरातल्या, आपल्या गावातल्या, कुटुंबातल्या माणसांना व्यथा-वेदना, विविध समस्या आणि जगण्यासाठी त्यांना कराव्या लागणाऱ्या संघर्षाचे चित्रण लेखक आपल्या कथांतून करत आहेत.

ग्रामीण कथात्मक वाङ्मयाचा अभ्यास करताना समाजात घडणाऱ्या चांगल्या, वाईट गोष्टी येतात. म्हणून मानवी जीवनात साहित्याला म्हत्त्वाचे स्थान आहे. त्यामुळे मराठी साहित्याचा अनादीकाळापासून कथा, कविता, नाटक, कादंबरी, प्रवासवर्णन, आत्मकथा इत्यादी विविध वाङ्मयीन प्रकारांचा समावेश होतो. आधुनिक काळात ग्रामीण, आदिवासी, दलित अशा सामाजिक वर्गाच्या जीवनाचे चित्रण साहित्यात केले जात आहे. त्याचबरोबर आधुनिक मराठी साहित्यात ग्रामीण मानवी जीवनातील अनुभवांचा आढावा घेतला जात आहे. म्हणून मराठी ग्रामीण साहित्यात कथा व कादंबरी या वाङ्मय प्रकाराला चालना मिळाली आहे. मराठी कथेचा उगम मध्ययुगीन कालखंडातील महानुभव संप्रदायाच्या वाड्.यात झालेला दिसून येतो. आधुनिक काळात कथात्म वाङ्मयाचा उदय ‘दृष्टांतपाठ’ मधून पुढे आलेल्या शेती आणि शेतकरी यांच्या ग्रामीण जीवनातून झालेला दिसून येतो. ‘अधारिचीये परिसाचा दृष्टांत’ हे त्याचे उत्तम

उदाहरण आहे. कथा हा वाङ्मय प्रकार फार प्राचीन असून समाजामध्ये त्यांचे महत्त्व अनन्यसाधारण असेच होते. कारण, कथा ऐकणे ही समाजाची भावनिक भूक असल्याने तिच्याइतका सर्वस्पर्शी असा वाड्.मय प्रकार शोधुनही सापडत नाही. एकंदरीत व्यक्तीच्या जन्माबरोबरच कथेचाही जन्म झाला असे म्हणावे लागेल. विकास प्रक्रियेमुळे कथात्म वाङ्मयाचा अधिक जोमाने विकास होत आहे. कारण, 'कथा' ही मानवी जीवनप्रवाहाबरोबर चालणारी, वाढणारी आणि त्यात कालपरत्वे परिवर्तन होणारी वाङ्मय कृती आहे.

ग्रामीण कथात्म वाङ्मयाचा उगम प्रामुख्याने ग्रामीण जीवन पद्धतीचा आरसा आहे. यामध्ये ग्रामीण भागातील व्यक्ती, त्यांचे जीवन, परिसर आणि त्यांची जडणघडणीचा अभ्यास कथात्म वाङ्मयात केला जातो. कथात्म वाङ्मयामध्ये ग्रामीण जीवनामध्ये होणारे बदल, जून्या रूढी परंपरामधील होणारे मूल्यसंघर्ष आणि इतर ग्रामीण वास्तव चित्रणाचा समावेश होतो. पहिली ग्रामीण कथा म्हणून हरीभाऊ आपटे यांची 'काळ तर मोठा कठीण आला'-१८१८ यांच्याकडे पाहिले जाते. मराठी साहित्यात वास्तववादी साहित्याचा प्रारंभ करणाऱ्या हरिभाऊ आपटेंनी १८९७ साली महाराष्ट्रामध्ये पडलेल्या दुष्काळाचे चित्रणावर आधारित कथा लिहिली. ही कथा दुष्काळाने शेतकऱ्यांची वाताहत कशी झाली त्याचेच चित्र या कथेमध्ये रेखाटले आहे. हरिभाऊंची कथा हा मराठीतील ग्रामीण कथेचा आरंभ बिंदू असला तरी ग्रामीण कथेला सुस्पष्ट रूप देणारे पहिले कथाकार म्हणून म. माटे यांची 'उपेक्षितांचे अंतरंग' हा कथासंग्रह १९४१ रोजी प्रसिद्ध झाला. महात्मा ज्योतिभा फुले यांनी सुरू केलेले शिक्षण तळागाळातील लोकापर्यंत पोहोचले पाहिजे या दृष्टीने हरिभाऊ लिखान करीत होते. ग्रामीण माणसांनी त्यांने अनुभव साहित्याच्या मुख्य प्रवाहात येऊन व्यक्त करण्यासाठी हरिभाऊंच्या कथेनंतर

३ ते ४ दशकांनी कृष्णराव भालेकरांनी 'बळीबा पाटील' ही कादंबरी लिहिली. येथूनच खऱ्या अर्थाने ग्रामीण कथेला सुरूवात झालेली दिसून येते.

१९२० नंतर ग्रामीण कथेला स्वतःचे अधिष्ठान प्राप्त झालेले दिसते. १९२५ ते १९४० या काळात ग्रामीण जीवन, ग्रामीण संस्कृती, श्रद्धा, अंधश्रद्धा, रीती-रिवाज, निसर्गाचे वर्णन यामध्ये येण्यास सुरूवात झाली. त्यामुळेच १९४५ नंतर मराठी कथा नवकथेच्या रूपाने बाहेर येण्यास सुरूवात झाली. ग्रामीण जीवनातील वैशिष्ट्यासह एकसंघ दर्शन घडविणाऱ्या कथेची सुरूवात व्यंकटेश माडगुळकरांच्या 'गावाकडच्या गोष्टी' पासून झालेली दिसते. तत्पूर्वीची ग्रामीण मराठी कथा सांकेतिक स्वरूपाची होती. त्यात सुखठणकर, ठोकळ, सरदेसाई, माटे इत्यादींचा समावेश होता. परंतु निखळ ग्रामीण कथा प्रथम मांडगुळकरांनीच लिहिली. त्यांनी माणदेशच्या परिसरातील ग्रामीण जीवनाची नाडी अचूक ओळखली तेथील माणूस त्यांचे अंतर्गत परिस्थितीनुसार बदलणारे व्यक्तीचे दर्शन घडविले.

मराठवाड्यातील ग्रामीण कथाकारांमध्ये बी. रघुनाथांपासून सुरू झालेल्या या परंपरेत आजच्या मराठवाड्यातील तरूण लेखकांनीदेखील आपल्या समाजाचे, परिसराचे प्रश्न मांडायला सुरूवात केली आहे. मराठवाड्यातील या कथाकारांच्या कथांमधून प्रामुख्याने शेतकरी, सालगडी, मजूर, कष्टकरी स्त्री यांचे चित्रण येते. मराठवाड्यात सतत पडणारा दुष्काळ, निसर्गाच्या अवकृपेने होरपळून निघणारे ग्रामीण जीवन त्यामुळे होणारी उपासमार त्यातही स्वतःचा स्वार्थ बघणारे राजकारणी, पुढारी, ढोंगी आणि भ्रष्ट नेते, भांडवलदार, शासन व्यवस्था इत्यादींचे चित्रण या कथांमधून होते.

मराठी ग्रामीण कथेने एक नवे वळण दिले. ग्रामीण जाणिवाचे प्रकटीकरण करीत असताना त्यांच्या ग्रामीण अनुभवांचे विश्व विस्तारले. २००० नंतर कथालेखन करणाऱ्या

लेखकांनी शेतकऱ्यांचे कष्टमय जीवन आणि दरिद्री जीवन व्यक्त केले आहे. ग्रामीण माणसांच्या मनाची गुंतागुंत, त्यांची आंदोलने व विविध पैलू मराठवाड्यातील कथाकारांच्या कथांमधून चित्रित होतात. मराठवाड्यातील ग्रामीण कथेला एक नवा आयाम देण्याचा प्रयत्न करणाऱ्या कथाकारांमध्ये प्रभाकर हरकळ, उत्तम बावस्कर, आसाराम लोमटे, भास्कर बडे, सुरेंद्र पाटील, नारायण शिंदे, आनंद कदम, राजेंद्र गहाळ, बा. बा. कोटंबे, शंकर देशमुख बारडकर, नागनाथ, पाटील, ग.पि मनूरकर, विजय चव्हाण, भारत काळे, आनंद पुपलवाड, गणेश आवटे, आनंद गायकवाड, अंबादास केदार, विठ्ठल जाधव, बबनराव आखाडे, माधव हैबतकर, भीमराव वाघचौरे, विजय जावळे, उमेश मोहिते, विठ्ठल मोगरे, ललिता गादगे, मथु सावंत इत्यादी लेखकांनी आपले प्रश्न प्रामाणिकपणे आणि पोटतिडिकीने मांडले आहेत. या लेखकांनी ग्रामीण मराठवाड्यातील जीवनातील दशा, दिशा व परिवर्तनाचे दर्शन घडविले. ग्रामीण वास्तव चित्रित करणारे हे कथा वाङ्मय सकस व वैशिष्ट्यपूर्ण आहे. एकूणच मराठी कथावाङ्मयात मराठवाड्यातील कथालेखकांचे एक स्वतंत्र स्थान निर्माण झाले आहे.

समस्यासूत्रण

संशोधनकार्यात समस्येला अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. क्षेत्र कोणतेही असो मग ते कृषी, आरोग्य, सामाजिक, धार्मिक, आर्थिक, राजकीय, वैज्ञानिक, भौगोलिक, अवकाश, ग्रामीण कथात्म वाङ्मय इत्यादींमध्ये संशोधन समस्या केंद्रस्थानी असते. संशोधन समस्या निश्चित केल्याशिवाय संशोधनकार्य करणे अशक्य असते. संशोधनाच्या पायऱ्यामध्ये समस्या ही प्रथम पायरी आहे. त्यामुळे, संशोधकाला संशोधन करण्यासाठी सर्वात अगोदर ससस्या निवडणे आवश्यक असते. अलीकडील काळात कथात्म वाङ्मयाला समाजामधून मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळत आहे. यांचे प्रमुख कारण म्हणजे बोलीभाषा, वैचारिकता, लोकजीवन प्रादेशिकता आणि सांस्कृतिक लोककला

आहेत. कथात्म वाङ्मय, कादंबरी, नाट्य आणि लोककला इत्यादीवर पुणेरी लोकांचाच प्रभाव होता. परंतु अलीकडच्या काळात प्रदेशपरत्वे चांगल्या प्रकारे लिखान होताना दिसून येते. मराठवाड्यामध्येसुद्धा ग्रामीण कथात्म वाङ्मयावर लिखान होत असल्यामुळे अभ्यासासाठी मराठवाडा हेच क्षेत्र निवडले आहे. अभ्यासाच्या दृष्टीने **"मराठवाड्यातील ग्रामीण कथात्मक वाङ्मयाचा चिकित्सक अभ्यास (विशेष संदर्भ इ. स. २००५ ते २०१५)"** असा विषय निवडण्यात आला.

विषय निवडीमागील भूमिका

पुणे विभागातील कथा आणि कादंबरी लोक साहित्यावर खूप मोठ्या प्रमाणात संशोधन झाले आहे. परंतु त्या तुलनेत मराठवाड्यातील लोक साहित्यावर संशोधन झाले नसल्यामुळे येथील लोक साहित्यावर संशोधन होणे आवश्यक होते. तसेच मराठवाड्यातील ग्रामीण साहित्यातून समाजाचे चित्र रेखाटत असताना येथील रूढी-परंपरा, भाषा, लोककला, संस्कृती, लोकजीवन, निसर्ग सौंदर्य आणि शेतकऱ्यांचे जीवन इत्यादी बाबींवर लिखान झाले आहे का ? असेल तर येथील लोक साहित्याला मोकळे विश्व प्राप्त करूण देण्यासाठी "मराठवाड्यातील ग्रामीण कथात्मक वाङ्मयाचा अभ्यास (विशेष संदर्भ इ. स. २००५ ते २०१५)" विषय निवडला. संशोधन अभ्यासाच्या माध्यमातून येथील कथात्म वाङ्मयाचे स्वरूप, वैशिष्टे, सामर्थ, सौंदर्य, मर्यादा इत्यादी बाबींवर प्रकाश टाकण्याचा प्रमुख हेतू असेल.

संशोधनाची उद्दिष्टे

संशोधन समस्येचे विधान व संरचनात थोड्याफार प्रमाणात गोंधळ निर्माण होऊ शकतो. अशा प्रकारचा गोंधळ टाळण्यासाठी संशोधन समस्येचे नेमक्या शब्दात प्रतिपादन

होणे गरजेचे असते. हे नेमकेपण संशोधन प्रश्न, उद्दिष्टे परिकल्पना तसेच कार्यात्मक व्याख्यांच्या लिखाणाने येते. उद्दिष्टे संशोधकाला आणि प्रतिसादकाला जास्त सुस्पष्टता देतात. संशोधनाचा पाया उद्दिष्टे आहे. त्यामुळे ते संपूर्ण संशोधन प्रक्रियेला मार्गदर्शक ठरतात. उद्दिष्टांची यादी फारच लहान किंवा फारच मोठी नसावी. उद्दिष्टांच्या स्पष्टेतून संशोधक नेमके काय शोधणार आहे याचे दिग्दर्शन होते.

कोणतेही संशोधन हाती घेत असताना संशोधक काही प्रश्नांवर भर देतो. संशोधक प्रश्नांची रचना वाक्यानुसार करता. काही संशोधक उद्दिष्टांनाच प्रश्नरूपाने मांडतात असे करणे टाळणे पाहिजे. त्यामुळे उद्दिष्टांचे पुनः पुन्हा मांडणी होते. अभ्यासाच्या स्वरूपावरून आधारित संशोधन परिकल्पनेची मांडणी, रचना करतो परिकल्पना या पूर्वी झालेल्या संशोधनातून, सैद्धांतिक रचनेतून उगम पावतात. संशोधक पूर्वी झालेल्या संशोधन कार्याचा अनुशंगाने परिकल्पनांचे स्वरूप निश्चित करू शकतो. त्यामुळे संशोधकास संशोधन परिकल्पना लिहिणे शक्य होते. परिकल्पनेच्या मांडणीरून संशोधकास त्या क्षेत्रातील पुरेसे ज्ञान आहे हे समजते तसेच माहिती संकलन आणि विश्लेषण करण्याची दिशाही समजते. त्यामुळे परिकल्पना ही परिक्षणक्षम असावी, स्पटीकरणक्षम असावी आणि दोन चलांतील सहसंबंध दर्शविणारी असावी.

प्रस्तुत अभ्यास पूर्ण करण्यासाठी खालील संशोधनाचे उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहेत.

१. इ. स. २००५ ते २०१५ या कालखंडातील ग्रामीण कथात्मक वाङ्मयाचे स्वरूप आणि वाटचालीचा शोध घेणे.
२. मराठवाड्यातील ग्रामीण भाषिक वैशिष्ट्यांचा शोध घेणे.

३. मराठवाड्यातील ग्रामीण कथात्म वाङ्मयातील प्रादेशिकता आणि वास्तवाचा शोध घेणे.

४. इ. स. २००५ ते २०१५ या कालखंडातील कथात्म वाङ्मयाचे वेगळेपण शोधणे.

५. मराठवाड्यातील ग्रामीण कथात्म कृषिनिष्ठ जीवन संघर्षाचा अभ्यास करणे.

६. मराठवाड्यातील ग्रामीण कथात्म साहित्याचा आशय व वेगळेपण शोधणे.

संशोधनाची गृहीतकृत्ये

वैज्ञानिक पध्दतीने एखाद्या विषयाचा अभ्यास करत असताना प्रारंभिक ज्ञानाच्या आधारे संशोधक सामान्यअनुमान मांडतो हे अनुमान पुढील संशोधनासाठी मार्गदर्शक ठरत असते. अशा पूर्वानुमानास गृहीतकृत्य वा उपकल्पना म्हणतात. वेबस्टर शब्दकोष १९५६ नुसार गृहितकृत्ये म्हणजे एखादे गृहित धरलेले विधान तत्व किंवा एखादी अट होय. गृहीतकृत्याच्या उपयुक्तेबाबत समाजशास्त्रीय संशोधक व अभ्यासक एल. कोटेन व नॅगेल म्हणतात. चौकशी वा संशोधनास चालना देणाऱ्या प्रारंभिक अडचणीचे वा समस्याचे संभाव्य निराकरण वा उत्तर सुचविल्या खेरिज आपण संशोधन कार्यात पहिले पाऊल देखील उचलू शकत नाही. समस्येची अशी संभाव्य उत्तरे आपणास अध्ययन विषयाबाबतच्या पूर्वज्ञानामुळे सूचतात अशा उत्तराचे जेव्हा विधानामध्ये रुपांतर केले जाते तेव्हा ती उत्तरे गृहीतकृत्ये बनतात. प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने संशोधनाची काही गृहीतकत्ये खालीलप्रमाणे दिले आहेत.

१. मराठवाड्यातील शेतकरी कुटुंबाच्या जीवन अनुभवाचे वास्तव्य स्वरूप कलात्मक रितिने मांडणे.

२. इ. स. २००५ ते २०१५ या कालखंडातील विविध कथासंग्रहाचे व कादंबऱ्याच्या निवडक लेखकांचा अभ्यास करणे.

३. ग्रामीण जीवनातील रूढी, परंपरा, संस्कृती, जीवन, व्यवहार, भावभावनांचा चिकित्सक दृष्टिकोनाने अभ्यास करणे.

४. मराठवाड्यातील विविध ग्रामीण भागात घडणाऱ्या घटना व प्रसंगाचे बारकाईने अभ्यास करणे.

५. मराठवाड्यातील ग्रामीण वाङ्मयीन प्रतिभाशक्तीचा अभ्यास करणे.

अभ्यास विषयाचे महत्त्व

मराठी ग्रामीण कथांमध्ये काळानुरूप बदल होत गेले. या बदलांबरोबरच ग्रामीण कथेत येणारे विषय बदलत गेले. ग्रामीण कथाकारांनी त्यांच्या लेखनाच्या माध्यमातून ग्रामीण जीवनाचे अंतरंग उलगडण्याचा प्रयत्न केला. २००५ नंतरच्या ग्रामीण कथामधून नवोदित ग्रामीण कथेचा अभ्यास केला आहे. या अभ्यासाने कथाकारांच्या कथांतून येणाऱ्या ग्रामीण वास्तवाचे आकलन त्यांच्या कथेतून येणारा परिसर आणि परिसरातील भौगोलिक, सांस्कृतिक घडणीतून घडलेला ग्रामीण माणूस आणि कृषी जीवनाशी निगडित घटना, ग्रामीण जीवन शैली, त्याचे मन एकूणच ग्रामीण जीवनाचा समग्रपणे होणारा आविष्कार स्पष्ट झाला आहे. जागतिकीकरणाचा ग्रामीण जीवनावर झालेला परिणाम, राजकारण, समाजकारण, शिक्षणाचा प्रसार, प्रचार, माध्यमांचे वाढते जाळे, कृषी योजना आणि औद्योगिकीकरण इत्यादींचा परिणाम व्यक्ती जीवनावर झाला आहे. त्यामुळे या सर्व घटनांचा प्रस्तुत संशोधनात अभ्यास करणे महत्त्वाचे आहे.

पूर्व संशोधन साहित्याचा आढावा

संशोधनाच्या अनुषंगाने यापूर्वी झालेल्या संशोधनाचा आढावा घेणे क्रमपात असते. याच दृष्टिकोनातून खालील विषयाच्या संबंधी झालेल्या संशोधना आढावा खालीलप्रमाणे घेतला आहे.

१. यासंबंधी श्री. कैलास रायभान दौंड यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद येथे डॉ. दत्तात्रेय प्रभाकर डुंबरे यांच्या मार्गदर्शनाखाली इ. स. २००० ते २०१० कालखंडातील मराठी ग्रामीण कथात्म वाङ्मयाचा अभ्यास केलेला आहे.

२. प्रा. पवार रामलीला सुदामराव यांनी इ. स. २००० नंतरची मराठवाड्यातील ग्रामीण कथा : एक अभ्यास या विषयावर संशोधनाचे कार्य केले आहे. यामध्ये त्यांनी मराठी ग्रामीण कथा : एक दृष्टिक्षेप, २००० पूर्वीच्या मराठवाड्यातील ग्रामीण कथा, २००० नंतरच्या ग्रामीण कथेतील संघर्ष व व्यक्तिरेखा या दृष्टिकोनातून अभ्यास केला आहे.

प्रस्तुत संशोधनात मराठवाडाच्या २००५ ते २०१५ पर्यंच्या कालखंडातील कथाकार, व कादंबरीकार यांचा ग्रामीण कथासंग्रह व ग्रामीण कादंबरीचे स्वरूप, वैशिष्ट्ये, स्थान व प्रादेशिकता निश्चित करून ग्रामीण कथात्मक वाङ्मयाचे वेगळेपण शोधण्यासाठी महत्त्वाच्या व निवडक साहित्य कृतीची चिकित्सा करण्यात येईल.

संशोधन पद्धती

मराठी साहित्याच्या संशोधनामध्ये प्रयोगाऐवजी चिंतनाला महत्त्व दिले जाते. सदर संशोधन संमिश्र दृष्टिकोनातून होत असल्याने कथात्म परंपरेचा अभ्यास करताना प्रामुख्याने अन्वेषणात्मक संशोधन पद्धती, विश्लेषणात्मक संशोधन पद्धती, आणि वितरणात्मक संशोधन पद्धतीचा उपयोग करण्यात येईल. संशोधन विषयाच्या अनुषंगाने मराठवाड्यातील ग्रामीण कथाकारांची निवड करून त्यांचा जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन, सभोवतीचे जीवन, समाजातील व्यक्ती, कुटुंब समाज, तेथील संघर्ष, ग्रामीण कथाकारांची पार्श्वभूमी, समाजव्यवस्था, भौगोलिक परिसर, त्या परिसराची बोली,

लोकसंस्कृती, नातेसंबंधव त्यांच्यातील ताण-तणाव तसेच कथेची परंपरा, उपासना, ऐतिहासिक पद्धतीचा वापर करण्यात येईल. तर दोन कथेचे साम्यभेद तपासावयाचे असताना तोडझी संशोधन पद्धतीचा उपयोग करण्यात येईल. साहित्यातून प्रकट होणाऱ्या लेखकांच्या व्यक्तिमत्त्वाचे अभ्यास करताना व्यक्तिनिष्ठ संशोधन पद्धतीचा उपयोग करण्यात येईल.

संशोधन सामग्री

२००५ नंतर मराठवाड्यातील ग्रामीण कथा या विषयनुषंगोन संशोधन करताना केवळ उपलब्ध ग्रामीण कथांचाच अभ्यास पर्याप्त ठरत नाही. त्यासाठी संबंधित ग्रामीण कथाकारांची पार्श्वभूमी, तत्कालीन परिस्थिती, समाजव्यवस्था, राजकीय वातावरण, भौगोलिक जडणघडण, बोली, लोकसंस्कृती, बदलते नातेसंबंध या व अशा अनेक प्रश्नांचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

संशोधनाची मर्यादा

संशोधन कार्याला निश्चित स्वरूपाची दिशा असणे महत्त्वाचे आहे. कारण, संशोधनाला विशिष्ट आकार नसेल तर संशोधन कार्य दिशाहीन होत असते. ज्याप्रमाणे अथांग समुद्रामध्ये एखाद्या जहाजाचे होकायंत्र काम करत नसेल तर ते भरकटत असते. त्याचप्रमाणे संशोधनाला मर्यादा नसतील तर संशोधनसुद्धा दिशाहीन होत असते. त्यामुळे संशोधनाला निश्चित आकार येण्यासाठी मराठवाड्यातील ग्रामीण कथात्मक वाङ्मयाचा अभ्यास करण्यासाठी इ. स. २००५ ते २०१५ पर्यंत कालावधी निश्चित करण्यात आला आहे. ही या संशोधनाची मर्यादा आहे. अपवादात्मक परिस्थितीमध्ये संशोधनाच्या अनुषंगाने काही संदर्भ साहित्याचा उल्लेख येऊ शकतो.

संशोधनाचा आराखडा

प्रकरण पहिले : कथात्म साहित्य : संकल्पना

कथा हा वाङ्मय प्रकार फार जुना व लोकप्रिय आहे. कारण, कथा ऐकणे ही माणसाची भावनिक भूक असल्याचे दिसून येते. कथा ही मानवी जीवनप्रवाहाबरोबर चालणारी, वाढणारी आणि बदलत जाणारी वाङ्मयीन कृती आहे. कथाकार आपल्या जीवन अनुभवातून वास्तवरुपाने किंवा कल्पनेतून मानवी जीवनावर प्रकाश टाकून कथा पूर्ण करतो. ती विषय, आशय, व्यक्तीचित्रण आणि पात्राच्या दृष्टीने लघू आकाराची असते. म्हणून तिला लघूकथाही म्हणतात. प्रस्तुत प्रकरणामध्ये कथात्म साहित्याची संकल्पना व स्वरूप, ग्रामीण कथेची प्रेरणा आणि ग्रामीण कथेचे स्वरूप इत्यादी घटकांचा अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकर दुसरे : मराठी ग्रामीण साहित्य : स्वरूप

ग्रामीण साहित्यने ग्रामजाणिवा आपल्या साहित्यामध्ये वास्तव रुपाने मांडल्यामुळे मराठी साहित्य प्रवाहामध्ये आज ग्रामीण साहित्याची एक वेगळी ओळख निर्माण झालेली आहे. ग्रामीण समाजातील मानवी जीवनाचे चित्रण ग्रामीण साहित्यिकांनी योग्य पद्धतीने मांडले असल्यामुळेच ग्रामीण साहित्याला वेगळी ओळख निर्माण झाली आहे. याच दृष्टीने प्रस्तुत प्रकरणामध्ये ग्रामीण साहित्य : एक वाङ्मयीन संकल्पना, ग्रामीण साहित्याच्या प्रेरणाचे स्वरूप आणि ग्रामीण साहित्याच्या स्वरूपाचा अभ्यास करण्याचे निश्चित केले आहे.

प्रकरण तिसरे : मराठवाडा : प्रदेश आणि लेखन

साहित्य निर्मितीची प्रयोगशाळा म्हणून पुणे किंवा मुंबई सारख्या शहरी भागाकडे बगीतले जाते. परंतु या साहित्यकारांच्या लिखानामध्ये ग्रामीण साहित्याचा अभाव

असलेला दिसून येतो. खरे पाहिले तर ग्रामीण साहित्याची भूमी ही शहरी भाग नसून ग्रामीण भागच आहे. त्यामुळे मराठवाडा प्रदेशामध्ये इ.स. २००५ ते २०१५ दरम्यानच्या कालखंडात झालेल्या कथात्म वाङमयीन साहित्य निर्मितीचा आढावा प्रस्तुत प्रकरणामध्ये घेण्यात येणार आहे.

प्रकरण चौथे : मराठवाड्यातील ग्रामीण कथात्म साहित्याचे वेगळेपण

साहित्य नगरीची पंढरी म्हणून पुण्याकडे पाहिले जाते. त्यामुळे ग्रामीण भागातील साहित्य निर्मितीकडे दुर्लक्ष होत होते. त्यामुळे मराठवाड्याच्या ग्रामीण कथेतील लोकजीवन, सामाजिक व सांस्कृतिक लोकजीवनाचे वैशिष्ट आणि कथात्म साहित्याचे वेगळेपण शोधण्यासाठीच मराठवाड्यातील ग्रामीण कथात्म साहित्याचा अभ्यास प्रस्तुत प्रकरणामध्ये करण्यात येणार आहे.

प्रकरण पाचवे : मराठवाड्यातील ग्रामीण कथात्म साहित्याची भाषा व अभिव्यक्ती

महाराष्ट्रामध्ये सर्वत्र मराठी बोली भाषा बोलली जात असली तरी त्यात प्रदेशपरत्वे भिन्नता दिसून येते. कारण, पश्चिम महाराष्ट्रात कोल्हापूरी, कोकणात कोकणी, विदर्भात वऱ्हाडी, खानदेशात अहिराणी तर मराठवाड्यात मराठवाडी बोली भाषा बोलली जाते. त्यामुळेच मराठवाड्यातील ग्रामीण कथात्म वाङ्मयाची अभिव्यक्ती आणि ग्रामीण कथामध्ये योजलेल्या भाषेचा शोध घेण्याचा प्रमुख प्रयत्न असेल.

प्रकरण साहवे : मुल्यमापन

प्रस्तुत प्रकरणामध्ये कथात्म साहित्याची संकल्पना, मराठी ग्रामीण साहित्याचे स्वरूप, मराठवाडा प्रदेश आणि साहित्यिक लेखन, मराठवाड्यातील ग्रामीण कथात्म

साहित्याचे वेगळेपण आणि मराठवाड्यातील ग्रामीण कथात्म साहित्याची भाषा व अभिव्यक्ती इत्यादी घटकांचे मुल्यमापन प्रस्तुत प्रकरणामध्ये करण्यात येणार आहे.

प्रकरण सातवे : समारोप/उपसंहार

प्रस्तुत प्रकरणामध्ये अभ्यासाअंती हाती आलेल्या निष्कर्षाचा आढावा घेण्यात येईल.

संदर्भग्रंथ

१. प्रदीप पाटील, संदर्भ शोधतात, संगत प्रकाशन, नांदेड, प्रथमावृत्ती, २००२

२. प्रदीप पाटील, होरपळ (कथासंग्रह), निर्मल प्रकाशन, नांदेड, प्रथमावृत्ती, २०११

३. इंगोले कृष्णा, ग्रामीण साहित्य आणि वास्तव, सुगावा प्रकाशन, औरंगाबाद, २०११

४. खरात महेश, ग्रामीण साहित्य, आस्वाद आणि आकलन, कैलाश पब्लिकेशन, औरंगबाद, प्रथमावृत्ती, २००८

५. गायकवाड यादवराव, मराठी वाङ्मयाचा इतिहास नवे दृष्टिकोण, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, २००९

६. चंद्रकांत वादेवडकर, मराठी कादंबरी, चिंतन आणि समीक्षक मेहता पब्लिकेशन, पुणे, १९८३

७. जगनाळे रेखा, प्रादेशिक ग्रामीण साहित्य समीक्षेची समीक्षा, विजय प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती, २००७

८. नलगे पंढरी, ग्रामीण कादंबरी : बदलते स्त्रीजीवन, स्वरुप प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, २०१३

९. दत्ता भोसले, ग्रामीण साहित्य : एक चिंतन, मेहा पब्लिकेशन होऊस पुणे, प्रथमावृत्ती, १९८८

१०. वासुदेव मुलाटे, ग्रामीण साहित्य : स्वरूप व दिशा, कैलाश पब्लिकेशन, औरंगाबाद, २००६
११.मुलाटे वासुदेव, ग्रामीण साहित्य : स्वरूप व दिशा, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, २००६
१२. मनोहर सुरवाडे, मराठी ग्रामीण कथा लेखिकाचे योगदान, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, २०१३
१३. शंकर सखराम, झोंज, मंगेश सहदेव नारकर, मंगेश प्रकाशन, मुंबई, १९९८
१४. उद्धव शेळके, आसरा, राम टिकेकर, शाम प्रकाशन, अमरावती, १९९६
१५. मोहन शेळके, वणवा, उत्तमराव मानसपुरे, तारा प्रकाशन, नांदेड, १९९१
१६. रवींद्र शोभणे, दाहीदिशा, सुनील अनिल मेहता, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, १९९४
१७. अण्णाभाऊ साठे, खुळंवाडी, वामन विष्णू भट, अभिनव प्रकाशन, मुंबई, १९५७
१८. दादासाहेब मोरे, विमुक्त, गुलाबराव मारोती कारले, सुरेश एजन्सी, पुणे, १९९४
१९. आनंद यादव, उखडलेली झाडे, सुनील अनिल मेहता, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, १९९४
२०. आनंद यादव, झाडवाट, सुनील अनिल मेहता, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, २०००
२१. शरणकुमार लिंबाळे, रथयात्रा, गवळी, प्रचार प्रकाशन, कोल्हापूर, १९९३
२२. शरणकुमार लिंबाळे, हरिजन, सौ. यशोदा सोनार, चेतश्री प्रकाशन, अमळनेर, १९८८
२३. विजय वाकडे, वटवाघळाच्या पारंब्या, कार्यवाह, मराठवाडा साहित्य परिषद, मित्रमंडळ प्रकाशन, नांदेड, १९८१

२४. द. ता. भोसले, पाऊस, अनिलकुमार मेहता, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, १९८४

२५. ना. धो. महानोर, गावतल्या गोष्टी, आशा बाबा भांड, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, १९९१

२६. व्यंकटेश माडगूळकर, काळी आई, वा.पु. भागवत, मौज प्रकाशन, मुंबई, १९९२

२७.पाटील व्ही.बी., संशोधन पद्धती, प्रशांत पब्लिकेशन जळगाव, प्रथमावृत्ती, २०१२

२८. चौधरी.ए.एन.भक्कड, संशोधन पद्धती, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव, प्रथमावृत्ती, २०१२

२९. भांडारकर पी.एल, सामाजिक संशोधन पध्दती, हिमालय पब्लिकेशन हाऊस, दिल्ली, प्रथमावृत्ती, १९९४

३०. गुरुनाथ नाडगोडे, सामाजिक संशोधन पध्दती, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००१

३१. प्रा.एस.डी.दराडे, संशोधन पद्धती, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव, प्रथमावृत्ती २०१३

३२. प्रदिप आगलावे, सामाजिक संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर

३३. Kothan C.R., Research Methodology, Methods and Techaigues, New Delhi, Age International Publisher. २००६

संशोधक **मार्गदर्शक**

पूजा संजय मोरे

प्रा. डॉ. पृथ्वीराज तौर
मराठी विभाग
भाषा आणि साहित्य संकूल
स्वा. रा. ती. म. विद्यापीठ, नांदेड